मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

परस्परं भावयन्तः

म प्र

# हितगुज

*अंक ६५ ● संपादक : लक्ष्मण शंकर (पृष्ठ ५२०) ● मार्च २००६*

(व्यक्तींची नावे देताना 'मराठे' आडनाव वगळले असून कंसात कुलवृत्तांतातील माहितीचा पृष्ठ क्रमांक दिला आहे.)

(फक्त खाजगी वितरणासाठी)

## म. प्र. दैनंदिनी २००६चे स्वागत

मराठे प्रतिष्ठान दैनंदिनीचे कुलबांधवांनीच नव्हे तर अन्य लोकांनीहि उत्स्फूर्तपणे स्वागत केले. अनेकांनी पुण्यात व मुंबईत फोन करून या उपक्रमाचे कौतुक केले. एका सूनबाईंनी सूचना केली की पृष्ठदान छापताना छायाचित्रासह (Stamp size) छापावे. खरंच कल्पना छान आहे. त्यासाठी होणारा जादा खर्चहि देण्यास कुलबांधव तयार होतील. अशाच आणखी सूचना बांधवांनी आवर्जून पाठवाव्या. आपली दैनंदिनी अधिक आकर्षक व उपयुक्त व्हायला त्यामुळे मदतच होईल. काही लेखी प्रतिक्रिया खाली दिल्या आहेत.

१. ''दैनंदिनी २००६ अतिशय आवडली. पुण्यातील आपण सर्वांनी अल्प काळात कठीण अशी कल्पना प्रत्यक्षात आणलीत. आपणा सर्वांचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे.'' - **हेमंत मराठे**, सहकार्यवाह, मराठे प्रतिष्ठान, मुंबई

२. ''डायरी फारच सुंदर व उपयुक्त आहे. प्रतिष्ठानचा हा उपक्रम अधिकाधिक लोकप्रिय होईल व पुढे चालू राहील अशी खात्री आहे. या नवीन उपक्रमाचे प्रणेते व सर्व सहाय्यभूत सभासद यांचे अभिनंदन.'' - **विठ्ठल महादेव** (पृ.२३५), सांगली.

३. ''डायरी चांगली आहे. तसेच आपल्या प्रतिष्ठानतर्फे आपण काढत आहात ही कल्पना पण चांगली आहे. एक सूचना - कव्हर प्लॅस्टिकचे असेल तर वर्षभर चांगली टिकेल. मी पण पृष्ठदान करणार आहे. तरी प्रसिद्धीपूव आपण कळवावे म्हणजे चेक पाठवीन.'' **प्रकाश गणेश विद्वांस** (पृ.६४५), अहमदाबाद.

४. ''अतिशय मेहनत घेऊन तयार केलेली दिनदर्शिका दैनंदिनी २००६ मिळाली. धन्यवाद. दोन प्रती मिळाल्या.'' - **नंदकुमार दिनकर** (पृ.२१९), कोल्हापूर.

* * *

## मराठ्यांचे उद्योग !

- **वामन गणेश** (पृ.५०३), जोगेश्वरी, मुंबई

डायरी आपली का?
हो आपलीच
आपलीच म्हणजे मराठ्यांची
वा! छान!
सगळेच मराठे की हो!
हो ना!
अहो कितीसे आहेत मराठे?
ह्याच्या दस पट
म्हणजे साधारण ३००० तरी?
छे, छे. त्याहूनही अधिक
मग, समजा ४००० तरी?
हो बहुतेक!
अहो पण मला सांगा, हे सगळे
मराठे काय करतात हो?
काय करतात म्हणजे?
उद्योग करतात.
कसले उद्योग?
रिकामे उद्योग.
रिकामे उद्योग म्हणजे,
ही काय भानगड बुवा?
अहो, एक मराठे
दुसऱ्या मराठेला भेटला
की झाल्या त्यांच्या गप्पा सुरू
मग गप्पांच्या ओघात
हे वाट्टेल ते करतात
वाट्टेल ते म्हणजे काय?
कुणीतरी वधुवर स्थळे शोधतो,
तर कोणी चिवडा वडे बनवतो
कुणीतरी संगीत चिवडाही बनवतो
कुणी गातात,
कुणी पौराहित्यही करतात
अरे वा!
अरे वा काय?
पौराहित्य मराठे बाईहि करतात
खरंच का? हे सगळं
कसं काय जमतं हो?
जमायचं काय त्यांत?
केलं की सगळं जमतं.
नाहीतर टाळीसुद्धा वाजत नाही.
हो, तेही खरंच.
टाळी वाजवायलाही
दोन हात हवेतच ना?
तशी ही टाळी... मराठ्यांची.
द्या टाळी!

* * *

आपण वास्तुप्रकल्प देणगी कधी देणार? - **कल करे सो आज कर, आज करे सो अब**

मराठे प्रतिष्ठान

पब्लिक ट्रस्ट नोंदणी क्र. ई. ७९१८ (मुं. ता. १२/१/१९८१)

मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५. दूरध्वनी : २४३०२४५३.

वेबसाईट : www.marathepratishthan.org

# प्रतिष्ठान वृत्त

**कार्यकारी मंडळ**

प्रत्येक महिन्याच्या **दुसऱ्या शनिवारी सायंकाळी ४ वाजता** कार्यकारी मंडळाची सभा होते. सभेच्या दिवशी कोणीहि सभासद कार्यकारी मंडळाला भेटण्यासाठी येऊ शकतो.

मागील तिमाहीत **१० डिसेंबर २००५, २१ जानेवारी २००६ व ११ फेब्रुवारी २००६ रोजी कार्यकारी मंडळाच्या सभा घेण्यात आल्या.** कार्याध्यक्ष आनंदराव उपस्थित राहू न शकल्याने २१ फेब्रुवारीची सभा कार्योपाध्यक्ष रमाकांत विद्वांस यांच्या अध्यक्षतेखाली झाली.

या सभांमध्ये पत्रव्यवहार, जमाखर्च इ. नित्याच्या कामांशिवाय खालील विशेष चर्चा वा निर्णय झाले.

१. परदेशातील कुलबांधवांसाठी आजीव सदस्यत्व वर्गणी व हितगुज तहहयात वर्गणी अनुक्रमे २५ व ५० अमेरिकन डॉलर घेण्यात यावी असे ठरविण्यात आले. (१०.१२.०५)

२. प्रतिष्ठानच्या वास्तुप्रकल्पासाठी **मातोश्री राधाबाई यांच्या स्मरणार्थ रु. २५,०००** दिल्याबद्दल त्यांचे सुपुत्र शशिकांत व कालिदास बाळकृष्ण, गोवा (पृ.५४१) यांचे आभार मानण्यात आले. (१०.१२.०५)

३. प्रादेशिक पातळीवर **मराठे परिवाराने गावागावात सभा भरवाव्या.** पुरेशी पूर्वसूचना मिळाल्यास कार्यकारी मंडळ सदस्यांनी अशा सभांना उपस्थित रहावे. (२१.१.०६)

४. सौ. मंगला प्रवीण मराठे, गोरेगांव यांच्या **कुटुंब सल्ला योजनेबाबतच्या** पत्रावर चर्चा झाली. याबाबत पूर्वाध्यक्ष अरविंदरावांनी डोंबिवलीत असे कार्य लवकरच सुरू करण्याचे आश्वासन २०-१०-२००४ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेत दिले होते. याबाबत पाठपुरावा व्हावा असे ठरविण्यात आले. (२१.१.०६)

५. मराठे प्रतिष्ठान दैनंदिनी प्रकल्प यशस्वीपणे राबवल्याबद्दल पुणे शाखा पदाधिकाऱ्यांचे कौतुक करण्यात आले. (२१.१.०६)

६. वास्तुप्रकल्पासाठी परदेशातील कुलबांधवांनी किमान रु. १००० अमेरिकन डॉलर देण्याचे आवाहन करण्याचे ठरविण्यात आले. (११.२.२००६)

**वर्धापन दिन समारंभ व 'दैनंदिनी' प्रकाशन**

पुणे शाखेतर्फे प्रतिवर्षी २६ जानेवारीला मराठे प्रतिष्ठानचा वर्धापनदिन समारंभ साजरा होतो. या वर्षी पुणे शाखेने मराठे प्रतिष्ठान दैनंदिनी २००६ काढली व ती १ जानेवारीपूर्वी कुलबांधवांना मिळावी. या दृष्टीने वर्धापनदिन व दैनंदिनी प्रकाश समारंभ २५ डिसेंबर रोजी पुण्यात करण्यात आला. याचा वृत्तान्त याच अंकांत स्वतंत्रपणे दिला आहे.

**गोमंतक मराठे परिवाराची श्रीव्याडेश्वर सेवा**

गोमंतक मराठे परिवाराची श्रीव्याडेश्वर तसेच दुर्गादेवी चरणी अल्पशी का होईना सेवा रूजू व्हावी म्हणून रु. ५०००० (रु. पन्नास हजार) कायमस्वरूपी ठेव गुहागर येथील 'बँक ऑफ इंडिया' मध्ये ठेवण्यात आली आहे. या ठेवीवरील त्रैमासिक व्याज श्रीव्याडेश्वर - दुर्गादेवीच्या सेवेत अर्पण करण्याची तरतूद करण्यात आली आहे. हा सोपस्कार दि. ६ फेब्रुवारी २००६ रोजी गो. म. परिवाराचे विश्वस्त कृष्णा काशिनाथ व इतर सभासदांनी गुहागर येथे प्रत्यक्ष जाऊन पूर्ण केला. त्याच दिवशी प्रथम व्याडेश्वरचरणी पूजा, अभिषेक, लघुरुद्राची सेवा अर्पण केली. गेल्या दोन वर्षापासून मनात असलेल्या संकल्पाला पूर्णत्व प्राप्त झाले.

श्री देव व्याडेश्वराची गुहागर येथील तळी (लहान तळे) ही सध्या उपेक्षित अवस्थेत आहे. ६ फेब्रुवारीला आम्ही तिथे गेलो, तेव्हा तेथील व्यवस्थापकांना या तळीच्या संदर्भात विचारले असता ते म्हणाले की, रस्तारुंदीकरणात ती तळी बुजविण्याचा विचार आहे. या तळीत देवाचा 'नौकाविहार' वगैरे कार्यक्रम होतो का? असे विचारले असता असा कोणताही इथे कार्यक्रम होत नाही, असे ते म्हणाले. त्यामुळेच तिच्याकडे दुर्लक्ष होत असावे.

ही वस्तुस्थिती विचारात घेऊन या तळीचे नूतनीकरण तसेच संरक्षण करण्याबाबतचा निर्णय घ्यावा लागेल.

**- सौ. शुभदा दीपक** (पृ.५३३),
शिरोडा, गोवा

**गोमंतक मराठे परिवास संमेलन**

सालाबादप्रमाणे या वर्षीचे गोमंतक मराठे परिवार संमेलन ८ जानेवारी २००६ रोजी प्रदीप अनंत (पृ.५३८) वेळगे, ता. डिचोली यांच्या घरी संपन्न झाले. याचा वृत्तांत याच अंकात स्वतंत्रपणे दिला आहे.

**वास्तुप्रकल्प**

मराठे प्रतिष्ठानच्या वास्तुप्रकल्पाचे कुलबांधवांकडून स्वागत होत आहे. मात्र निधि संकलन कार्याने अजून वेग घ्यायला हवा. केवळ २०० कुलबांधवांनी प्रत्येकी रु. २५,००० दिले तरी ५० लाखांचे उद्दिष्ट साध्य होऊ शकते. या योजनेचा पाठपुरावा करण्याची जबाबदारी खालील तीन कार्यकारी मंडळ सदस्यांनी स्वाकारली आहे.

१. **रमाकांत माधव विद्वांस,** कार्योपाध्यक्ष, फ्लॅट नं. ३१, गुडविल अॅश्युरन्स बिल्डींग, मनमाला टँक रोड, माहीम, मुंबई ४०००१६. फोन : २४३०५२६०, २४३२४८४०. सेल : ९८२०२२४०१४

२. **प्रभाकर दामोदर मराठे,** कोषाध्यक्ष, ८/१३, सहकार नगर, वडाळा (प.), मुंबई ४०००३१. फोन : २४१५०८८९. सेल : ९८२०२३२०८२.

३. **हेमंत महादेव मराठे,** २/१८, शिवानंद सोसायटी, विलेपार्ले (पूर्व), मुंबई ४०००५७. फोन : २६१७७७५७, २६१५२८७४.

कुलबांधवांनी आपला सहभाग तातडीने प्रतिष्ठानकडे पाठवावा असे आवाहन आहे.

**वर्गणी व देणग्या**

डिसेंबर २००५ ते फेब्रुवारी २००६ या तिमाहीत प्राप्त झालेल्या सभासद व हितगुज वर्गणी आणि देणग्यांचा तपशील खालीलप्रमाणे-
* ही खूण केलेल्या रकमा पुणे शाखेकडे जमा.

**उपकारकर्ता सभासद**

सौ. मंजिरी गिरीश जाखोटिया*, विलेपार्ले (रु. ५०००)

आजीव सभासदत्व व हितगुज वर्गणी : (प्रत्येकी रु. ३००) - धनंजय मनोहर*, पुणे, राजीव नारायण*, पुणे, सौ. मालती जयंत गोखले*, पुणे, पुरुषोत्तम नारायण*, नाशिक, वसंत श्रीराम*, पुणे, सौ. मंजिरी गिरीश जाखोटिया*, विलेपार्ले, सौ. स्मिता वसंत जोशी, बदलापूर, विवेक सुहास, ठाणे, नितीन रघुनाथ, बेळगाव (एकूण ९).

**हितगुज वर्गणी (प्रत्येकी रु. २००)**

वासुदेव कृष्णा मराठे (चक्रदेव)*, नाशिक, विवेक सुधाकर*, नाशिक.

**आजीव सभासद**

पंकज प्रकाश*, नाशिक (रु. १००)

**जाहिरात हितगुज**

श्रीपाद नारायण आणि कुटुंबीय, बेळगाव (रु. २०००), सौ. स्मिता वसंत जोशी, बदलापूर (रु. २५०), कृष्णा काशिनाथ, हरवळे, साखळी, गोवा (रु. २५०), श्री मराठे कॅटरर्स, डिचोली, गोवा (रु. ६००), कोटेश्वर रेसिडेन्सी, डिचोली, गोवा (रु. ६००), निलेंद्र दत्तोबा, धारबांदोडा, गोवा (रु. ६००), प्रभाकर दामोदर, वडाळा (रु. ६००), नितीन रघुनाथ (Accurate Engineers), बेळगाव (रु. ६००).

**शिक्षण निधी**

श्रीमती शकुंतला गोविंद नामजोशी, विलेपार्ले, (पितृस्मृती) (रु. १०१), वामन गणेश, जोगेश्वरी (निबंध स्पर्धेसाठी) (रु. ५००), श्रीमती शैलजा प्रभाकर* (रु. ५००)

**हितगुज निधी**

अनिल दत्तात्रय जाईल, घाटकोपर (टपाल खर्चासाठी) (रु. २२१)

**कुलवृत्तांत निधी**

वामन गणेश, जोगेश्वरी (रु. १२००), बाळकृष्ण केशव, पाली (रु. ६००), डॉ. मुकुंद मराठे, शिरसी, कर्नाटक (रु. ६००).

**वास्तुप्रकल्प बिनाव्याज ठेव**

आनंद यशवंत, ठाणे (रु. २५,०००), कालिदास आणि शशिकांत बाळकृष्ण, फोंडा, गोवा (रु. २५,०००). ***

# सभासद वृत्त

## मानसन्मान

**कृष्णा काशिनाथ यांना साने गुरूजी कथामाला पुरस्कार**

अखिल भारतीय साने गुरुजी कथामालेच्या चाळिसाव्या अधिवेशनामध्ये गोवा प्रदेश साने गुरूजी कथामालेला २००५-०६ साठी आदर्श शाखा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. पुरस्काराचे स्वरूप शाल-श्रीफळ-स्मृतिचिन्ह व रोख रु. १०००. गोवा शाखेच्या वतीने हा पुरस्कार **गोवा प्रदेश साने गुरुजी कथामाला अध्यक्ष श्री. कृष्णा काशिनाथ** (पृ.५२३) यांनी प्रमुख पाहुणे न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या शुभहस्ते स्वीकारला. सर्व मराठे परिवारातर्फे कृष्णा काशिनाथ यांचे अभिनंदन.

**सौ. अपूर्वा अरुण यांचे सुयश**

आंध्र प्रदेश युनिव्हर्सिटीतर्फे विशाखापट्टण येथे घेण्यात आलेल्या इंडियन इकॉनॉमिक असोसिएशनच्या ८८व्या परिषदेमध्ये गोव्यातील **अर्थशास्त्राच्या प्राध्यापिका सौ. अपूर्वा अरुण** यांनी 'Fiscal health of Goa and its dependence on centre' या विषयावरील संशोधनपर निबंधाचे वाचन केले. हा शोधनिबंध एक उत्कृष्ट शोधनिबंध म्हणून त्याची असोसिएशनने निवड केली होती. या कामी त्यांना गोवा युनिव्हर्सिटीच्या डॉ. रेखा गांवकर यांचे मार्गदर्शन लाभले होते. सौ. अपूर्वा अरुण (पृ.५३१) यांचे मराठे परिवारातर्फे अभिनंदन.

**'कर्नल प्रमोदन मराठ्यांचे' पुस्तक विनाशातून विजयाकडे**

पुण्यातील मराठे प्रतिष्ठानचे कार्यकर्ते **कर्नल प्रमोदन प्रभाकर** (पृ.३८८) यांचे आपत्ती व्यवस्थापनावर (डिझास्टर मॅनेजमेंट) आधारित 'विनाशातून विजयाकडे' हे पुस्तक नुकतेच प्रकाशित झाले. कोणत्याही नैसर्गिक आपत्तींमध्ये आपला स्वत:चा व इतरांचा जीव कसा वाचवावा या संदर्भात त्यांनी उपयुक्त मार्गदर्शन या पुस्तकात केलेले आहे.

कर्नल प्रमोदन मराठे यांनी वरील पुस्तकाचे मूळ लेखन Concepts and practices in Disaster Management या नावाने इंग्रजीतून केलेले आहे. त्यात स्वानुभवावर आधारित अभ्यासपूर्वक विचार नमूद केले आहेत. त्याचा उपयोग समाजातील सर्व स्तरातील व्यक्तींना, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना, सामाजिक संस्था व त्यांच्या कार्यकर्त्यांना होईल याची खात्री आहे. ही सचित्र, मुद्देसूद, आकर्षक व उपयुक्त पुस्तके (इंग्रजी व मराठी) पुण्यातील डायमंड प्रकाशनने प्रकाशित केली आहेत. हा प्रकाशन समारंभ मंगळवार दि. ३.१.२००६ रोजी संध्याकाळी ५ वा. पत्रकार भवनमध्ये पार पडला. मराठी व इंग्रजी पुस्तकांचे प्रकाशन सकाळ वृत्तपत्राचे संपादक मा. श्री. यमाजी मालकर यांच्या शुभहस्ते झाले. या प्रकाशन समारंभाला अनेक मराठे कुलबांधव उपस्थित होते. (प्रेषक : श्रीमती लीला बळवंत मराठे)

**मंगला मराठे यांचे 'एक जिग सॉ पझल'**

'स्वाधार' या कौटुंबिक सल्ला केंद्रातील **समुपदेशक मंगला प्रवीण** (पृ.३६१) यांचे 'लग्न एक जिग सॉ पझल' हे पुस्तक मुंबईतील 'नवचैतन्य प्रकाशन' ने नुकतेच प्रसिद्ध केले आहे. जोडीदाराची निवड करताना अथवा लग्न ठरवताना कोणती काळजी घ्यावी, स्थळांची चौकशी कशी करावी, लग्नानंतर निर्माण झालेल्या नवीन नात्यात सुखसंवाद निर्माण करून तो कसा टिकवावा, घटस्फोटाचा टोकाचा विचार करण्याऐवजी सगळेच मनासारखे घडत नाही हे लक्षात घेऊन तडजोड करण्यातच शहाणपणा कसा असतो इ. विषयांचा परामर्श या पुस्तकात घेतला आहे. विवाहासंबंधीच्या कायद्यांचीहि तोंड ओळख या पुस्तकात करून दिली आहे.

आजच्या काळात अतिशय उपयुक्त पुस्तक प्रसिद्ध केल्याबद्दल लेखिकेचे आणि प्रकाशिकेचेहि (तीहि मराठेच आहे) मराठे प्रतिष्ठानतर्फे अभिनंदन. (साभार : लोकसत्ता, मुंबई, रविवार दि. २४.७.०५)

**सहस्रचंद्रदर्शनी माहेरवाशीण**

मराठे परिवारातील **ज्येष्ठ माहेरवाशीण श्रीमती शकुंतला गोविंद नामजोशी** (इंदु हरि, पृ.१२०) यांनी दि. २१ नोव्हेंबर २००५ ला ८१व्या वर्षात पदार्पण केले त्यानिमित्त त्यांच्या पार्ले येथील राहत्या घरात, सहस्रचंद्र दर्शनाचा

कार्यक्रम संपन्न झाला. या शुभसमयी उत्सवमूर्तीचे आशीर्वाद घ्यायला आणि त्यांना उत्तम आरोग्य लाभून, वृद्धत्वाचा काळ सुखाचा जावा या शुभेच्छा देण्यासाठी सर्व नातलग, स्नेही, आप्तेष्ट मंडळी जमली होती.

मराठे प्रतिष्ठानतर्फे श्रीमती इंदुताईंचे अभीष्ट चिंतन आणि 'जीवेत् शरदः शतम' ही शुभेच्छा. (प्रेषक : डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर)

### धावपटु श्रिया नितिन विद्वांस

ठाणे येथील सदस्य **नितिन गोविंद विद्वांस यांची मुलगी श्रिया** (पृ.६२६) गेली तीन वर्षे सातत्याने नॅशनल स्कूल गेम्स मध्ये धावण्याच्या शर्यतीत भाग घेऊन पारितोषिके मिळवत आहे. जानेवारी २००६ मध्ये पुण्यात झालेल्या नॅशनल स्कूल गेम्समध्ये तिने खालीलप्रमाणे कामगिरी गेली.

१. १७ वर्षाखालील मुलींसाठी ४ x १०० मीटर रिले रेस मध्ये रौप्यपदक.

२. १७ वर्षाखालील मुलींच्या धावण्याच्या शर्यतीत ती ४थी आली. तिला पदक मिळाले नाही; पण तिने महाराष्ट्राचा या शर्यतीतला विक्रम मोडून नवा विक्रम निर्माण केला.

२०१० मध्ये व्हावयाच्या कॉमनवेल्थ गेम्ससाठी ट्रेनिंग कॅम्प घेण्यात यायचा असून त्यासाठी श्रियाची निवड झाली आहे.

श्रियाच्या यशाबद्दल सर्व मराठे परिवारातर्फे तिचे अभिनंदन आणि कॉमनवेल्थ मेन्समध्ये निवडीसाठी शुभेच्छा!

### ट्रॅव्हल कन्सलटंट -निरंजन प्रभाकर

मराठे प्रतिष्ठानचे कोषाध्यक्ष श्री. प्रभाकर आणि म. प्र. ची कार्यकारिणी सभासद डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर यांचा सुपुत्र **निरंजन प्रभाकर** (पृ.१२०) हा IATA Consultant Level डिस्टिंक्शन मध्ये उत्तीर्ण झाला. त्याने रूईया कॉलेज, माटुंगा येथे बी.एस्.सी. केले त्यानंतर गरवारे कॉलेज, कालिना येथे मुंबई विद्यापीठाचा 'ट्रॅव्हल अॅण्ड टुरिझम' हा पोस्ट ग्रॅज्युएटचा दोन वर्षांचा अभ्यासक्रम प्रथम श्रेणीत पूर्ण केला.

म. प्र. तर्फे निरंजनचे हार्दिक अभिनंदन.

### अपत्यप्राप्ती

१. मराठे प्रतिष्ठानचे **कार्याध्यक्ष आनंद यशवंत यांचा मुलगा मंदार (पृ.२७७) व सौ. सुप्रिया यांना** दि. २८.११.०५ रोजी **पुत्ररत्न** प्राप्त झाले. त्याचे **नांव मैत्रेय** ठेवण्यात आले आहे. यानिमित्त दि. ५.२.०६ रोजी ठाणे येथे लक्ष्मीकेशव मंगल कार्यालयात नामकरण आनंदसोहळा आयोजित करण्यात आला होता.

२. गोमंतक मराठे परिवाराचे प्रमुख **श्री. कालिदास बाळकृष्ण (पृ.५४१) यांची कन्या** (म. प्र. ची सदस्य) **सौ. अर्चना रामचंद्र अभ्यंकर** हिला दि. १८ डिसेंबर २००५ रोजी **पुत्ररत्न** प्राप्त झाले. बाळाचा नामकरण विधी श्री. कालिदास बाळकृष्ण यांच्या निवासात ढवळी, गोवा येथे थाटामाटात संपन्न झाला. बाळाचे **नांव 'हेरंब'** असे ठेवण्यात आले आहे.

३. मराठे प्रतिष्ठानचे संस्थापक सदस्य गोव्यातले **मोहन बाळकृष्ण** (आता वास्तव्य पुणे) **यांचा मुलगा मंदार (पृ.५२०) व सौ. आरती यांना** दि. १२.११.०५ रोजी **कन्यारत्न** झाले. बाळाचा **नामकरण** समारंभ २२ डिसेंबर २००५ रोजी साजरा करण्यात आला. मुलीचे **नांव मुक्ता** ठेवण्यात आले.

सर्वश्री आनंदराव, कालिदास आणि मोहन आजोबांचे मराठे परिवारातर्फे अभिनंदन आणि नवजात बालकांचे मराठे परिवारात स्वागत.

### कुर्यात् बटोर्मंगलम्

प्रतिष्ठानची **पुण्यातील माहेरवाशीण सभासद राधिका** (प्रशीला - सीताराम यशवंत, पृ. ५२०, गोवा, यांची मुलगी) व पुणे सकाळमधील उपसंपादक **मुकुंद लेले यांचा मुलगा यश** याचा व्रतबंध पुण्यात १९ फेब्रुवारी २००६ रोजी संपन्न झाला. बटूला आशीर्वाद देण्यासाठी नातेवाईकांप्रमाणेच सकाळच्या संपादकीय विभागातील अनेक जण आवर्जून उपस्थित होते.

### नांदा सौख्य भरे

१. बेळगांवमधील सदस्य **भास्कर नारायण (पृ.५२५) यांचा मुलगा परेश** याचा विवाह माधव परशुराम जोशी, सांगली यांची कन्या शिल्पा हिच्याशी ३ डिसेंबर २००५ रोजी सांगली येथे संपन्न झाला.

२. मराठे प्रतिष्ठानचे संस्थापक सदस्य तसेच प्रतिष्ठानच्या नुकत्याच गोव्यात झालेल्या ८व्या अ. भा. संमेलनाचे स्वागताध्यक्ष **सदाशिव नारायण यांची मुलगी धनश्री** (पृ.५२१) हिचा विवाह बांदा येथील अभिराम धुंडिराज पणशीकर यांच्याशी २३.१२.२००५ रोजी श्री रवळनाथ महालक्ष्मी हॉल, मुळगांव, गोवा येथे थाटामाटात संपन्न झाला.

३. मिरज येथील कुलबांधव **अरविंद नारायण यांचा पुत्र अमित** (पृ.४२८) याचा विवाह श्रीराम नीळकंठ उकिडवे यांची कन्या कीर्ती हिच्याशी ८ जानेवारी २००६ रोजी सांगली येथे संपन्न झाला. विशेष म्हणजे या दोन्ही पक्षांनी सांगलीतल्या म. प्र. वधु-वर माहिती केंद्रात नांवे नोंदवली होती.

४. बेळगावातील प्रतिष्ठानचे सदस्य **रामचंद्र यशवंत यांची कन्या तृप्ती** (पृ.५२५) हिचा विवाह सरोज व शरदचंद्र फडके, कोल्हापूर, यांचा मुलगा महादेव ऊर्फ केदार याच्याशी २२ जानेवारी २००६ रोजी लक्ष्मी मंगल कार्यालय, कोल्हापूर येथे संपन्न झाला.

५. पुण्यातील प्रतिष्ठानचे क्रियाशील सभासद **अनिल लक्ष्मण (पृ.५०२) यांचा मुलगा आमोद** याचा विवाह सौ. स्मिता आणि बाळकृष्ण कुलकर्णी यांची मुलगी शिल्पा हिच्याशी संपन्न झाला. त्यानिमित्त पुणे येथे १९ फेब्रुवारी २००६ रोजी सायंकाळी स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला होता.

**सर्व नवविवाहित वधू-वरांचे मराठे प्रतिष्ठानतर्फे अभिनंदन.**

### सहवेदना

१. पुण्यातील कुलबांधव, पुणे शाखेच्या कार्यकर्त्या सौ. नीलांबरी मराठे यांचे चुलत सासरे **भालचंद्र गणेश** (पृ.२७९) यांचे शुक्रवार दिनांक १०.२.०६ रोजी संध्याकाळी हृदयविकाराच्या झटक्याने दुःखद निधन झाले. ते ९० वर्षांचे होते. १९३७ पासून १९७७ पर्यंत अशी ४० वर्षे ते व त्यांचे धाकटे बंधू कै. रामचंद्र गणेश मराठे असे दोघे मिळून पुण्यातील विश्रामबाग वाड्याशेजारी 'मराठे टाईपरायटर्स' हे दुकान चालवीत होते. व्यवसायातून निवृत्त झाल्यावर त्यांनी कथाकथन

# दैनंदिनी - २००६ चे प्रकाशन आणि 'मराठे प्रतिष्ठान'चा २६वा वर्धापन दिन

**- सौ. नीलांबरी रमेश** (पृ.२८०), पुणे

'मराठे प्रतिष्ठान' च्या पुणे शाखेने सर्व मराठे मंडळींची जवळीक साधावी आणि त्यातून जो निधी उभा राहील त्याची संस्थेच्या स्वत:च्या कार्यालय उभारणीसाठी मदत होईल ह्या हेतूने 'दैनंदिनी २००६' प्रकाशित करण्याचा प्रकल्प हाती घेतला. नवीन वर्षाच्या पहिल्या दिवसापासूनच दैनंदिनीचा उपयोग व्हावा असा निश्चय कार्यकारिणीने केला होता व त्या दृष्टीने कामाचे नियोजन केले होते.

संकल्प केल्याप्रमाणे दि. २५ डिसेंबर २००५ ह्या दिवशी पुण्यात प्रतिष्ठानचा वर्धापन दिन समारंभ आणि 'दैनंदिनी २००६' चे प्रकाशन मराठे प्रतिष्ठानचे संस्थापक सदस्य मा. श्री. वा. ग. मराठे ह्यांचे शुभहस्ते संपन्न झाले. प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. आनंद यशवंत मराठे आणि उपाध्यक्ष मा. श्री. रमाकांत माधव विद्वांस आशीर्वाद देण्यासाठी उपस्थित होते.

सौ. नीलांबरी रमेश मराठे ह्यांनी मान्यवरांचे व सर्व उपस्थित सभासदांचे स्वागत केले. दैनंदिनीचा प्रकाशन समारंभ आणि प्रथेप्रमाणे दरवर्षी २६ जानेवारीस साजरा केला जाणारा वर्धापन दिन एकत्र साजरा करण्यामागील भूमिका विशद केली. श्री. श्रीनिवास गोपाळ मराठे ह्यांनी दैनंदिनी २००६ ह्या संकल्पनेमागचा हेतू व उपयोगिता ह्या संबंधी उहापोह करून सर्व सभासदांच्या सहकार्याने दरवर्षी हा प्रकल्प राबविण्याचे आश्वासन दिले. श्री. अरुण दत्तात्रेय मराठे ह्यांनी सर्व मान्यवरांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला.

ह्या दिन-विशेषानिमित्त पुण्यातील प्रख्यात गांधर्व महाविद्यालयाचे प्रमुख व प्रथितयश हार्मोनियम वादक आणि आपले कुलबंधु **प्रमोद धुंडिराज मराठे** ह्यांचा अत्यंत श्रवणीय व भान हरपून टाकणारा हार्मोनियम वादनाचा कार्यक्रम झाला. तसेच मा. सौ. अनिता रघुनाथ मराठे ह्या आपल्या कुलभगिनींच्या सौजन्याने त्यांच्या संजीवनी भक्ती संगीत मंडळाचा सुगम संगीत, टिपऱ्या, घागरी फुंकणे व नवरात्रीतील देवीची नऊ रूपे असा बहारदार कार्यक्रम झाला. ह्या दोन्ही कार्यक्रमांनी सर्व श्रोत्यांची मने जिंकली. अडीच तास सर्वजण संगीतमय झाले होते. डॉ. सौ. आपटे यांचे सूत्रसंचालन उत्तम होते.

त्यानंतर अल्पाहार व कॉफीपान होऊन कार्यक्रमाची सांगता झाली. दैनंदिनीतील सर्व जाहिरातदार व पृष्ठदाते ह्यांच्या सक्रिय सहकार्याबद्दल पुणे शाखा कार्यकारिणी सर्वांचे मनापासून हार्दिक आभार मानते. ***


*आजी लक्ष्मी हरि मराठे*
*यांच्या स्मरणार्थ*

**प्रभाकर दामोदर मराठे**
वडाळा, मुंबई - ४०० ०३१.


---

करणे, पोवाडे म्हणणे, स्वानुभव कथन करणे असे करमणुकीचे अनेक कार्यक्रम सादर केले होते. लहान मुलांसाठी कोडी तयार करण्याचा त्यांना छंदच होता. आनंद, कुमार यासारख्या लहान मुलांच्या मासिकातून त्यांचे लेखन प्रसिद्ध झालेले आहे. त्यांना माणसांचीही खूप आवड होती.

२. प्रतिष्ठानचे क्रियाशील सभासद, रत्नागिरीतील १९९७ मधील म. प्र. च्या अखिल भारतीय अधिवेशनाचे निमंत्रक **भास्कर नरहरी (पृ.४६)**, रत्नागिरी यांचे फेब्रुवारी २००६ च्या सुरवातीला दु:खद निधन झाले.

३. मराठे प्रतिष्ठानचे मिरज येथील सभासद **शरद विष्णू (पृ.४५३)** यांचे २२ नोव्हेंबर २००५ रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. ते ५८ वर्षांचे होते. मिरज येथील गणेश इंजिनिअरिंग वर्क्स व मराठे इंजिनिअरिंग वर्क्सचे ते संचालक होते. लाँड्री यंत्रासह विविध उत्पादनात दोनही कारखाने सर्वदूर प्रसिद्ध आहेत. गणेश बंबामुळे (कै.) मराठे सर्वत्र परिचित होते. उद्योग क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबद्दल त्यांना महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सने पारखे पुरस्काराने गौरविले होते.

४. पुण्यातील कुलबांधव **लक्ष्मण चिंतामण चक्रदेव (पृ.७३७)** यांचे २६.८.०५ रोजी वयाच्या ८५व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांनी बॉम्बे इंजिनिअरिंग ग्रुप, खडकी येथे केंद्र सरकारची नोकरी केली. नोकरी करताना शिक्षण चालू ठेवून B.A. पदवी संपादन केली.

५. खुडीपाट येथील कुलबांधव **बाळकृष्ण दिनकर** (पृ.११४) यांचे ११ ऑक्टोबर २००५ रोजी वयाच्या ७५व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले.

६. प्रतिष्ठानचे मुंबईतले क्रियाशील सभासद, माजी कार्यकारी मंडळ सदस्य **अनंत रामचंद्र** (पृ.३९२) यांचे १४.१२.०५ रोजी अल्पशा आजारानंतर हृदयविकाराच्या झटक्याने अचानक निधन झाले. अलिकडे ते पुण्यात स्थायिक झाले होते. तिथे त्यांना माइल्ड हार्ट अ‍ॅटॅक आला. त्यातून बरे झाल्यावर ४-५ दिवसांनी त्यांना मुंबईत आणले. न्यूमोनियाची शंका आल्यामुळे आणखी काही तपासण्या करण्यासाठी त्यांना मुंबईत हॉस्पिटलमध्ये अ‍ॅडमिट केले असता अचानक मॅसिव्ह हार्ट अ‍ॅटॅकने त्यांची प्राणज्योत मालवली. कापडगिरणीतून निवृत्त झाल्यानंतर रेक्झिन उद्योगातले सल्लागार म्हणून ते काम करीत होते. त्यांनी रत्नाकर वाशीकर यांच्यासह संयुक्तपणे लिहिलेल्या 'पहिला भारतीय वैमानिक' या पुस्तकाचे दोन वर्षापूर्वी ग्रंथालीतर्फे मुंबईत थाटामाटांत प्रकाशन झाले होते. त्याबद्दल त्यांचा मराठे प्रतिष्ठानच्या कार्यकारी मंडळाच्या सभेत सत्कारहि करण्यात आला होता.

*सर्व मृतांच्या कुटुंबीयांच्या दु:खात मराठे परिवार सहभागी आहे.*

***

# गोमंतक मराठे परिवार संमेलन २००६

**- सौ. शुभदा दीपक** (पृ.५३३), शिरोडा, गोवा

गोमंतक मराठे परिवार वार्षिक संमेलन रविवार दि. ८ जानेवारी २००६ रोजी प्रदीप अनंत (पृ.५३८), वेळगे, ता. डिचोली यांच्या निवासस्थानी संपन्न झाले.

संमेलनासाठी प्रदीप अनंतच्या दारात घातलेला छोटासा मांडव. मांडवाची उत्तम अशी सजावट आदल्या रात्री उशिरापर्यंत खपून प्रदीप, सौ. प्राजक्ता व प्रदीपची आई श्रीमती इंदिरा अनंत यांनीच पूर्ण केली होती. अंगणात सुंदरशी रांगोळी काढली होती. तुळशी वृंदावनासमोर समई मंद तेवत होती.

अशा या मंगलमय वातावरणात रविवारी सकाळी ठीक १० वाजता संमेलनाला सुरवात झाली. संमेलनाच्या उद्‌घाटनाला प्रमुख अतिथी होते निवृत्त शिक्षक श्री. शिवराम भि. बर्वे.

गो.म.प.चे कार्यवाह प्रदीप अनंत यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले व प्रमुख अतिथी शिवराम बर्वे, संमेलनाध्यक्ष नीळकंठ परशुराम व गो.म.प.चे प्रमुख कालिदास बाळकृष्ण यांना आसन ग्रहण करण्याची विनंती केली.

सर्वप्रथम जे कुलबांधव आज आपल्यात हयात नाहीत अशा ज्ञात, अज्ञात कुलबांधवांना स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली वाहण्यात आली.

चि. प्रणव व चि. उत्कर्षा या छोट्यांनी मधुर स्वरात ईशस्तवन गायिले. उपस्थितांचे स्वागत, प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय प्रदीप अनंत यांनी करून दिला.

परिचयानंतर मान्यवरांचे पुष्प व पुस्तक प्रदान करून स्वागत करण्यात आले आणि प्रमुख अतिथींच्या हस्ते समई प्रज्वलित करण्यात आली. श्रीव्याडेश्वराच्या फोटोला पुष्पमाला अर्पण करण्यात आली.

सर्वप्रथम प्रत्येकाने स्वत:चे नाव, शिक्षण, व्यवसाय, विशेष नोंद या स्वरूपात आपापला परिचय करून दिला. विशेष म्हणजे छोटे सदस्यही यात उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते.

**प्रमुख पाहुणे शिवराम बर्वे** यांनी आपल्या छोटयाशा भाषणात ब्राह्मण हे समाजाचे 'मुख' आहे असे पुरुषसूक्तातील वचन असून खरोखरच ब्राह्मण हा समाजाचा मार्गदर्शक आहे हे विविध उदाहरणे देऊन स्पष्ट केले. 'ब्राह्मणांनी इतर समाजाला अज्ञानात ठेवून त्यांच्यावर अन्याय केला' हे विधान धादांत खोटे आहे, हे त्यांनी सुतार, कुंभार इ. व्यावसायिकांची उदाहरणे देऊन पटवून दिले. जाती कोणीही निर्माण केल्या नाहीत तर प्रत्येकाच्या विशिष्ट अशा गुणांवर, कौशल्यावर त्या अवलंबून असतात. निसर्गानेच तशी रचना केली असावी अशा स्वरूपाचे छोटेसे पण समयोचित भाषण करून शेवटी आपल्या समाजातील एका आडनावबंधूंचे संमेलन भरते व त्यांचे कार्य उत्तरोत्तर वृद्धींगत होत आहे, हे पाहून आपणाला अतिशय आनंद झाला. अशीच संमेलने भरवावी, संपर्कातून उत्कर्ष साधावा ही सदिच्छा व्यक्त करून त्यांनी आपल्या भाषणाला पूर्णविराम दिला.

**अध्यक्षीय भाषणात नीळकंठ परशुराम** यांनी संमेलनाला उपस्थिती वाढविण्याची आवश्यकता आहे. तसेच परिवारातील सर्वांनी वर्षातून एक दिवस एकत्र यावे, चर्चा करावी त्यातून आपला संपर्क वाढत जाईल. गरजूंना आर्थिक तसेच शिक्षण सहाय्य म्हणून मदत देण्यास आपण सदैव तयार आहोत असे त्यांनी आवर्जून सांगितले.

प्रमुख पाहुण्यांचे आभार मानताना **कालिदास बाळकृष्ण** म्हणाले की, समयोचित भाषणासाठी श्री. शिवराम बर्वे यांचे मनापासून कौतुक करावे असे वाटते. इथे उपस्थित राहिल्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. आपल्या भाषणात त्यांनी पुढील मुद्दे मांडले -

१. गोमंतक मराठे परिवाराचा प्रतिनिधी अजूनही प्रतिष्ठानच्या कार्यकारिणीवर नाही, तो असावा असा विचार मांडला. ते पुढे म्हणाले की, **प्रतिनिधी नसतानाही प्रतिष्ठान आपल्याला यथोचित मान व आदर देते हे विशेष.**

२. मराठे प्रतिष्ठानच्या माध्यमातून श्री. ह. मो. मराठे यांच्या 'विद्वेषाच्या विरोधात जागृती मंच' या कार्याला एक लाख रुपयाची देणगी द्यावी असे स्वत: ह. मो. यांनी सूचित केले आहे.

३. तसेच ह. मों. च्या 'बालकाण्ड' च्या इंग्रजी अनुवादाचा खर्च 'मराठे परिवार गोमंतक' यांनी उचलावा असाही प्रस्ताव मांडला.

४. सत्तरी तालुक्यामध्ये 'गोमंतक मराठी साहित्य संमेलन' भरवावे व संमेलन प्रतिनिधी म्हणून मराठे परिवारातील सदस्यांनी भरीव योगदान द्यावे.

५. आजच्या संमेलनाला पेडणे विभागातून प्रतिनिधी आले आहेत, ही अत्यंत आनंदाची गोष्ट आहे. पुढील वर्षीचे संमेलनही पेडण्यात भरवावे असे ते सूचकपणे म्हणाले.

६. ज. गो. मराठे यांनी गीतेतील वेगवेगळे नऊ श्लोक निवडले आहेत. त्यांचे पठण परिवारातील बांधवांनी जरूर करावे.

मराठे परिवाराची आर्थिक स्थिती म्हणजेच आर्थिक अहवाल वाचनासाठी **अरुण शिवराम** (पृ.५३१) व्यासपीठावर आले. त्यांनी परिवाराचे आर्थिक अंदाजपत्रक हे नेहमीच शिलकी अंदाजपत्रक असते असे अभिमानाने सांगितले व ते यापुढेही तसेच असावे अशी इच्छा व्यक्त केली. यावर्षी रु. ५५०० (पाच हजार पाचशे) शांकर पाठशाळा, कवळे तसेच रु. ५००० (पाच हजार) मराठे प्रतिष्ठानकडे पाठविण्यात आले आहेत असे त्यांनी सांगितले.

दरवेळी संमेलन करतेवेळी त्या त्या विभागाने संमेलनाचा खर्च वजा जाता शिल्लक ठेवण्याची परंपरा राखली आहे. ती तशीच पुढे चालू ठेवावी असे त्यांनी आवाहन केले.

सहभोजनाचा कार्यक्रम दुपारी दीड ते अडीचपर्यंत चालला. श्री. केटररचे उत्कृष्ट असे कडबूचे गोड जेवण, त्यात सौ. प्रतिभा विश्वनाथ यांनी आणलेल्या खरवसाने जेवणाची लज्जत वाढवली. श्रीमती इंदिरा अनंत यांनी केलेले भाज्यांचे आयत्या वेळचे लोणचे सर्वांनाच आवडले. भोजनोत्तर घरी तयार केलेली रुचिक सुपारी चघळत, हास्यविनोदात, गप्पागोष्टीतच असताना दुसरे सत्र केव्हा सुरु झाले कळलेच नाही.

हे होते चर्चासत्र. विषय होते -

१) मराठ्यांचे कुलदैवत व्याडेश्वर-दुर्गादेवी चरणी गोमंतक मराठे परिवाराची सेवा वार्षिक एक दिवस.

२) प्रतिवार्षिक गोमंतक मराठे परिवाराचे संमेलन भरवावे किंवा नाही.

वरील विषयावर अनेक सदस्यांनी आपले विचार मांडले व चर्चा खूपच रंगली.

**कृष्णा काशिनाथ** म्हणाले -

१. संकल्पाला पूरक असा निधी जमवावा. किमान रु. २५,००० व्याडेश्वरचरणी तसेच रु. १५००० एवढा निधी असावा त्यात अजूनही वाढ करावी, योगदान करावे. आम्हीही गो.म. परिवाराच्या माध्यमातून या कार्यास हातभार लावू.

२. ह. मो. मराठे यांच्या कार्याला चित्पावन ब्राह्मण संघाने जास्तीत जास्त योगदान करावे. आम्हीही गो.म. परिवाराच्या माध्यमातून या कार्यास हातभार लावू.

३. प्रतिवार्षिक परिवार संमेलन एक दिवस न जमल्यास अर्धा दिवस का होईना पण भरवावेच असे ते म्हणाले.

**प्रदीप अनंत** - व्याडेश्वरचरणी गो. म. परिवाराची सेवा लवकरात लवकर रूजू व्हावी.

**पुरूषोत्तम विष्णु** - श्रीव्याडेश्वरचरणी सेवा/ उत्सव गोमंतक मराठे परिवाराने स्वत: जबाबदारी घेऊन तिथे जाऊन साजरा करावा. जादा येणारा खर्च स्वत: फंड जमा करून प्रतिवार्षिक उत्सव साजरा करावा. दरवर्षी फंडात वाढ करावी.

**नीळकंठ परशुराम** - आपण जे पैसे देवाला देणार आहोत ते सेवेसाठी आहेत. प्रतिवार्षिक उत्सव साजरा करायचा असल्यास वेगळा फंड जमवावा.

**कालिदास बाळकृष्ण** - आपण देवाला एकदा निधी दिला की आपला संबंध संपला. उत्सव करणे किंवा न करणे ही त्या कमिटीची जबाबदारी राहील.

पण वेगळ्या स्वरूपात सुद्धा आपण हा उत्सव साजरा करू शकतो. उदा. देवळासाठी रंगकाम करणे देवाच्या आवारात काही आवश्यक सुधारणा करणे इ. म्हणजेच देवस्थानच्या गरजेनुसार आपण सेवा करू शकतो. तसेच वार्षिक सभा बोलवावी. परिवार संमेलन मात्र दरवर्षी भरवावेच.

**अजित लक्ष्मण** - श्री व्याडेश्वरचरणी सेवा किंवा एक दिवसीय उत्सव हे प्रथम ठरवावे. सेवा असल्यास तिला विलंब लावू नये. सध्या ठरविलेल्या निधीच्या रु. ३०,००० च्या रकमेत वाढ करायची आहे. ज्यांना त्यासाठी योगदान द्यायचे आहे ते त्यांनी आत्ताच जाहीर करावे असे म्हणताच खालील सर्वांनी आपापली देणगीची रक्कम जाहीर केली ती अशी -

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. नीळकंठ परशुराम | रु. ५००० |
| २. | श्री. परशुराम दिवाकर | रु. ५००० |
| ३. | श्री. दीपक विश्वनाथ | रु. ५००० |
| ४. | श्री. कालिदास बाळकृष्ण | रु. १००० |
| ५. | श्री. अजित लक्ष्मण | रु. १००० |
| ६. | श्री. निलेंद्र दत्तोबा | रु. १००० |
| ७. | श्रीमती इंदिरा अनंत | रु. १००० |
| ८. | मंदाकिनी दांडेकर (मराठे) | रु. १००० |

अशाप्रकारे निधीत रु. २०,००० एवढी भरीव वाढ झाली आणि निधीची रक्कम रु. ५०,००० इतकी झाली.

**राजेश काशिनाथ** - आपण एक युवासदस्य असून कुलपुरूष, कूलदैवत वगैरे आपण मानत नाही. नवीन पिढीला यात रस नाही. त्यासाठी वेगळा विचार मांडावा.

सध्याचा नवीन विचार म्हणजे कित्येक तरूण बेकार आहेत. त्यांना स्वत:च्या पायावर उभे राहण्यास मार्गदर्शन तसेच मदत म्हणून कोणी निधी देऊ शकतो का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

हा विचार खूप आधी केलेला आहे. तशी तरतूद, तसेच आवाहन प्रत्येक संमेलनातून केलेले आहे. पण आजपर्यंत आपल्याकडे यासाठी कोणीही आलेले नाही, **असा खुलासा नीळकंठ परशुराम यांनी केला**.

पण या चर्चेतून एक चांगली गोष्ट निष्पन्न झाली, ती म्हणजे 'गोमंतक मराठे परिवार उद्योगनिधी' या नावाने फंड जमा करावा व आश्चर्य म्हणजे या निधीचा शुभारंभ युवा - राजेश काशिनाथ यांनी रु. १०,००० (दहा हजार) ची उद्योगनिधी देणगी जाहीर करून केला.

**अरुण शिवराम** - प्रतिवार्षिक परिवारसंमेलन असावेच. त्याचे फायदे असे - १) कुटुंबातील सर्वांची नोंद होते. २) नवीन माणसे जोडली जातात. ३) महत्त्वपूर्ण फायदा म्हणजे फंड जमा होतो.

**सौ. शुभदा दीपक** - एकूण चर्चेतून असे दिसून येते की संमेलन असावे की नसावे हा

## कै. चिंतामण बळवंत हस्ताक्षर स्पर्धा निकाल

हितगुज मासिकाच्या डिसेंबर २००५ च्या अंकात माझे वडील कै. चिंतामण बळवंत मराठे यांच्या नावाने हस्ताक्षर स्पर्धा जाहीर करण्यात आली होती. त्यानुसार पुण्यातून १०, मुंबईतून १३, मिरजेतून ४, गोव्यातून २ व ठाण्यातून २ अशा एकूण ३१ स्पर्धकांनी भाग घेतला. इयत्ता पाचवी ते वय वर्ष ८३ पर्यंतच्या स्पर्धकांनी भाग घेतला.

या निमित्त पुणे शाखेतील सभासदांची सभा माझ्या घरी घेऊन त्या सर्व सभासदांना हस्ताक्षरे दाखवून त्यांची मते लेखी नोंदविण्यात आली. त्यानंतर सर्व स्पर्धकांची हस्ताक्षरे हस्ताक्षर तज्ञ श्री. अरविंद पटवर्धन यांना दाखविण्यात आली. हस्ताक्षर तज्ज्ञांनी जाहीर केलेला निकाल पुढीलप्रमाणे : (गुण १०० पैकी)

**प्रथम क्रमांकाचे बक्षीस रु. २५० (विभागून)**

सौ. सुरेखा सुहास मराठे, मु. पो. मिरज, जि. सांगली - (गुण ९२)

सौ. शालिनी जाईल, मु. पो. ठाणे, जि. ठाणे - (गुण ९२)

**द्वितीय क्रमांकाचे बक्षीस रु. १५०**

श्री. पुष्कर सतीश मराठे, दादर, मुंबई. - (गुण ९१)

**तृतीय क्रमांकाचे बक्षीस रु. १००**

श्री. अरुण लक्ष्मण मराठे, मु. पो. मिरज, जि. सांगली. - (गुण ८७)

**प्रोत्साहनपर बक्षिसे रु. ५० प्रत्येकी**

डॉ. गिरीश प. जाखोटिया (पुण्यातील दत्तात्रय काशिनाथ यांचे जावई) मु. पो. विलेपार्ले (पूर्व), मुंबई. - (गुण ८६)

श्री. नरेंद्र के. खांबेटे, पुणे - (गुण ८५)

डॉ. सुप्रिया मराठे लिमये, पुणे - (गुण ८४)

सर्व स्पर्धकांचे अभिनंदन. स्पर्धकांनी बक्षिसे मार्च २००६ चा अंक प्रकाशित झाल्यानंतर वितरित करण्यात येतील.

**- गजानन मराठे,**

प्लॉट नं. ३४ अ, 'सार्थक', सेनादत्त कॉलनी, पुणे ४११०३०. फोन : २४३३१६५१

# धन्य झाले मी युरोप दौऱ्यानी

**- श्रीमती सुनंदा अरुण** (पृ.२५), मु. आशिये, जि. सिंधुदुर्ग

*प्रतिष्ठानचे सहकार्यवाह हेमंत अरुण (पृ.२१) यांची आई श्रीमती सुनंदा अरुण यांनी २०.६.०५ ते ७.७.०५ या काळात भ्रमणमंडळातर्फे (SOTC) युरोपमधील इंग्लंड, बेल्जियम, हॉलंड, जर्मनी, लिचेन स्टाईप, स्वित्झरलंड, ऑस्ट्रिया, इटली व फ्रान्स या देशांचा दौरा केला होता.*

*प्रवासात त्यांनी रोजच्या रोज सर्व कार्यक्रमाची निरीक्षणे तपशीलवार लिहून ठेवली आहेत. त्यापैकी २१.६.०५ च्या लंडन दर्शनाच्या नोंदी (त्रोटक स्वरूपात) वानगीदाखल येथे दिल्या आहेत. भावी पर्यटकांना यांतून प्रेरणा व मार्गदर्शन मिळावे हा हेतु. - संपादक*

**२१.६.०५ -** लंडन वेळेप्रमाणे आम्ही साडेअकरा वाजता विमानतळावर पोचलो. तेथे सर्व सोपस्कार करून उभ्या असलेल्या कोचमधून लंडनमध्ये फेरफटका मारण्यास सुरवात झाली.

प्रथम लंडनचे प्रतीक असलेले बिग बेन टॉवर हाऊस पाहिले. वरच्या भागात मोठे घड्याळ होते. बिग बेनवरील घंटा साडेतेरा टनाची आहे. बेन नावाचा कमिशनर होऊन गेला. त्याच्या नावाने हा टॉवर ओळखला जातो.

याला लागूनच १६५ वर्षापूर्वीच्या हाऊस ऑफ लॉर्डस् व हाऊस ऑफ कॉमन्स या इमारती आहेत. येथील टेम्स नदीवर बरेच पूल असून त्यातला प्रसिद्ध लंडन ब्रिज आहे. तेथे थोडा वेळ थांबून परिसर पाहिला.

लंडन हे ऐतिहासिक शहर असून ४०० वर्षांपासून ब्रिटनची राजधानी आहे. प्रथम येथे रोमनांचे वर्चस्व होते. त्यांचा पाडाव करून शहराची सुधारणा केली. आता याचे दोन भाग पडतात. १) सिटी ऑफ लंडन, २) वेस्ट मिन्स्टर. पहिल्यात खूप मोठ्या इमारती आहेत. चारशेऐंशी इंटरनॅशनल बँका आहेत. येथे सेंट पॉल चर्च असून जगात त्याचा दुसरा क्रमांक आहे. एवढा तो भव्य आहे.

१९६६ मध्ये लंडनला खूप मोठ्या प्रमाणात आग लागली. त्यामध्ये जुन्या इमारती जळून गेल्या. त्यानंतर सर्व इमारती दगडी बनविल्या आहेत.

अकराव्या शतकात राजा विल्यमने बांधलेल्या राजवाड्याचे रूपांतर मध्यंतरी जेलमध्ये झाले होते. पण काही काळानंतर येथे म्युझियम केले आहे. या कॉम्प्लेक्सला लंडन टॉवर म्हणतात. या म्युझियममध्ये भारतातील प्रसिद्ध कोहिनूर हिरा ठेवलेला आहे. सर्वात मोठा आफ्रिकन हिरा पण येथेच पहाता येतो.

पॅलेसच्या बाहेर पारंपारिक पोषाखात गार्ड्स् दिसतात. त्यांना पाहण्यासाठी खूप गर्दी असते. राजा फिलिपसोबत सध्या एलिझाबेथ राणी रहाते. हा राजवाडा भव्य असून तीनशे वर्षांपूर्वी बांधलेला आहे. यामध्ये एकूण ६०० कक्ष आहेत.

हा भाग पाहून आम्ही रात्री हॉटेल वॅम्ब्ले प्लाझा येथे उतरलो. जेवणानंतर एकत्र बसून गप्पा मारल्या. प्रत्येकाची पत्न्यासहित ओळख करून घेतली. आमचा ४७ चा ग्रुप होता. एकूण १८ जोडपी, ४ सिंगल पुरुष व आम्ही पाचजणा

## प्रवासाची तयारी

पाहिलेच ना कधी मी स्वप्नी।
कोरीलेच माझ्या मनी द्वय पुत्रांनी।

निश्चय केला माझ्या शरीरानी।
दिशा दिली भ्रमणमंडळानी।

चिंता न राहिली घरच्यांच्या मनी।
फराळादि तयारी केली दोन्ही सुनांनी।

खारे दाणे तयार केले 'अहो' नी।
चिकीसोबत ग्रीटींग दिले नातवंडांनी।

प्रत्यक्ष भेटून, फोनवरुन शुभेच्छा दिल्या हितचिंतकांनी
आशीर्वाद दिले प्रेमभरे आईनी।

प्रवासाला सुरुवात झाली विमानानी।
काहूर माजले मनी अनंत विचारांनी।

चित्त ठेविले नामस्मरणात गुंतवूनी।
धीर दिला गाईडच्या रुपात दिपकनी।

साथ दिली SOTC ग्रुपमधील सर्वांनी।
धन्य झाले मी युरोप दौऱ्यानी।

**ब्राह्मण व्यावसायिक पत्रिका**

हे मासिक पुण्यातून दरमहा प्रसिद्ध होत आहे - संपादक : गोविंद हर्डीकर, मासिकात व्यावसायिकांना उपयुक्त माहितीबरोबरच सफल व्यावसायिकांचे परिचय, अनुभव, विचार दिले जातात.

अंकाचे देणगी मूल्य रु. २०, पुण्यात वार्षिक रु. २००, पंचवार्षिक रु. ८००, भारतात इतरत्र वार्षिक रु. ३००, पंचवार्षिक रु. १२००. संपर्क : १३, हिमालय अपार्टमेंट, गल्ली क्र. ३, डहाणूकर कॉलनी, कोथरूड, पुणे ४११०३८ (फोन : २५४४२४३५)

*(गो.म.प. संमेलन.... मागील पानावरून)*

विषय बंद करून त्या जागी दरवर्षी संमेलन असावेच, पण दरवर्षी ते अधिक चांगल्या प्रकारे कसे होईल यावर चर्चा व्हावी.

